महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईदर- वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे
फोन.नं. ०२२-२९४५१००१
Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र १०३ दिनांक- १५/०४/२०२१

## तीन नायजेरीयन आरोपींना अटक करुन त्यांचेकडुन १६९८ ग्रॅम वजनाचा, रुपये ४२,७१,१७०/- किमतीचा "एम.डी अंमली पदार्थ जप्त", श्री प्रशांत वाघुंडे पोलीस उपआयुक्त,परिमंडळ-३ यांची कामगिरी.

---

मा.प्रशांत वाघुंडे, पोलीस उपआयुक्त परीमंडळ-३ मिरा-भाईदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांना गुप्त बातमीदारांकडुन माहीती मिळाली की, तुळींज पोलीस ठाणे हद्दीत नालासोपारा पुर्व, प्रगतीनगर येथे नायजेरीयन परकीय नागरीक हे अंमली पदार्थाची विक्री करण्याकरीता दिनांक १३/०४/२०२१ रोजी १०.०० वा.चे सुमारास येणार आहेत.

सदर बातमीनुसार तुळींज पोलीस ठाणेचे श्री राजेंन्द्र कांबळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक जी.जे.वळवी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना बोलावुन दोन पथके तयार केली. त्यानंतर सापळा रचुन कारवाई करण्याच्या योग्य त्या सुचना दिल्या व मार्गदर्शन केले. श्री प्रशांत वाघुंडे, पोलीस उपायुक्त यांचे सुचनेप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाच्या दोन पथकांनी ९० फिट रोड प्रगतीनगर येथे तीन नायजेरीयन नागरीक यांना शिताफीने पकडुन त्यांच्याकडुन **विक्री करीता आणलेला १६९८ ग्रॅम वजनाचा एम डी हा अंमलीपदार्थ ,वजनाचे साहीत्य असा एकुण- ४२,७१,१७०/- रुपये किंमतीचा मुददेमाल जप्त** करण्यात आला आहे.

सदरआरोपीना कायदेशीर रित्या अटक करण्यात आली असुन तुळींज पोलीस ठाणे, गुन्हा रजि नं ५२४/२०२१ एनडीपीएस कलम ८ क २१ क प्रमाणे दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपींनी हा अंमली पदार्थ कोठुन आणला व त्यांचे साथीदार कोण आहेत, याबाबत तपास चालु आहे.

सदरची उल्लेखनीय कामगिरी श्री प्रशांत वाघुंडे पोलीस उपायुक्त, श्री.अमोल मांडवे सहा.पोलीस आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक/राजेंन्द्र कांबळे,पोलीस निरीक्षक (गुन्हे)गंगाराम वळवी यांचे सुचनेनुसार तुळींज पोलीस स्टेशनचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपानि/संदेश पालांडे, पोउपनि/ज्ञानेश्वरकोकाटे, पोउपनि/प्रसाद शेनोळकर, सफौ/बाळु बांदल, सफौ/गवारी, पोहवा/अनिल शिंदे, पोना/आनंद मोरे, पो.ना./शेखर पवार,पोना/राकेश शिरसाठ, पोना/उमेश वरठा, पोना/सुनिल पाटील, पोना/अकबर सय्यद, पोशि/सुखराम गडाख, ,पोशि/योगेश नागरे, पोशि/विनायक राऊत यांनी केली आहे .

Scanned with CamScanner